# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/७४/२०१४-१५/२५६ दिनांक : ११.१२.२०१४

**<u>आदेश केस क्र. ७४/१४-१५</u>**

१) श्री. बाजीराव दगडू माने, - अर्जदार

संत सेना सहकारी गृह निर्माण संस्था
मु.पो. आष्टा, ता. वाळवा, जिल्हा - सांगली

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता, - पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इस्लामपूर

३) उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, आष्टा

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.जी. बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बाजीराव दगडू माने, संत सेना सहकारी गृह निर्माण संस्था मु.पो. आष्टा, येथे घरगुती कनेक्शन असून त्यांचा ग्राहक क्रमांक २८४१०००६५३६१ असा आहे.

**<u>तक्रारीचे स्वरुप</u>**

सदरील घरगुती कनेक्शनसाठी तक्रारदाराने दि. ३१.०१.२००५ रोजी म.रा.वि. मंडळ, उप विभाग आष्टा यांच्याकडे रु. ३२५०/- इतकी रक्कम भरली होती. त्यानुसार ग्राहकास कनेक्शन देण्यात आले. रु. ३२५०/- या रकमेमध्ये मीटर कॉस्ट रु. १०००/- व पीसीसी पोल रु. १०००/- व अनामत रक्कम रु. १२५०/- याचा समावेश आहे. वीज मिटरची मालकी महावितरण कंपनीचीच आहे, त्यामुळे नियमबाह्य वसूल केलेली मिटरची कॉस्ट रु. १०००/- परत मिळावी, तसेच माझ्या कनेक्शनसाठी कोणताही पोल उभा न केल्यामुळे माझ्याकडून वसूल केलेली रक्कम रु. १०००/- परत मिळावी अशी ग्राहकाची तक्रार आहे.

सदर तक्रारीची सुनावणी दि. २०.११.२०१४ रोजी कोल्हापूर येथे घेण्यात आली. तक्रारदार स्वतः हजर. महावितरणतर्फे श्री. गोंदील, उप कार्यकारी अभियंता, आष्टा हे हजर होते. ग्राहकाने सुनावणी दरम्यान त्यांच्याकडून नियमबाह्य रितीने वसूल केलेली मीटर कॉस्ट रु. १०००/- व पोल न वापरल्यामुळे पीसीसी पोलची किंमत रु. १०००/- परत मिळावी अशी मागणी केली.

महावितरणचे उप कार्यकारी अभियंता, आष्टा यांनी त्यांची बाजू मांडली.

१) मीटर शुल्क रु. १०००/- हे पावती क्र. ५६१५४३६ दि. ३१.०१.२००५ रोजी नवीन विद्युत कनेक्शनसाठी घेतलेले होते. सदर शुल्क हे विभागीय व्यावसायीक परिपत्रक क्र.६४६ दि. १७.०६.२०००, क्र. ६६८ दि. ३०.०७.२००२ व म.रा.वि.वि. कंपनीचे परिपत्रक क्र. ४ दि. ०७.०७.२००५ नुसार घेतलेले आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. ०८.०९.२००६ नंतर मीटर शुल्क भरलेल्या ग्राहकांनाच सदरचे शुल्क परत करणेबाबत निर्णय दिलेला आहे. त्यामुळे श्री. बाजीराव दगडू माने यांना दि. ३१.०१.२००५ रोजी भरलेले मीटर शुल्क परत करता येणार नाही.

२) पोल शुल्क रु. १०००/- हे सुध्दा पावती क्र. ५६१५४३६ दि. ३१.०१.२००५ रोजी सदरच्या विद्युत कनेक्शनसाठी घेतलेले होते. शाखाधिकारी आष्टा-१ यांच्या प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवालानुसार, सदरचा पोल हा श्री. बाजीराव दगडू माने, आष्टा यांच्या विद्युत कनेक्शनसाठी (ग्राहक क्र. २८४१०००६५३६/४) वापरलेला दिसून येत आहे.

वरील प्रमाणे श्री. बाजीराव दगडू माने यांचेकडून वसूल केलेले मीटर शुल्क रु. १०००/- व पोल शुल्क रु.१०००/- असे एकूण रु. २०००/- नियमाप्रमाणे योग्य आहेत.

३) सदर तक्रार दोन वर्षानंतर दाखल केल्यामुळे सदर अर्ज CGRF Regulation ६.६ नुसार दाखल करुन घेऊ नये.

ग्राहकासाठी त्यावेळी पोल उभा केलेला आहे असे सुनावणी दरम्यान वक्तव्य करण्यात आले. यावर तक्रारदार श्री. माने यांनी महावितरणने मंचास दिलेले लेखी उत्तर चुकीचे आहे व नकाशा चुकीचा आहे. कनेक्शन देतेवेळी पोल वापरलेला नव्हता. नोव्हेंबर २०१२ मध्ये कंपनीच्या कामासाठी पोल उभा केलेला आहे. माझ्याकडून वसूल केलेल्या पोल कॉस्टपोटी कोणताही पोल माझे कनेक्शन देतेवेळी उभा केलेला नाही. तरी मला मीटर कॉस्ट व पोल कॉस्टपोटी रु. २०००/- व्याजासह परत मिळावेत अशी विनंती मंचास केली.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होतो.

१) ग्राहकाच्या मागणीनुसार वसूल केलेली मिटरची किंमत रु.१०००/- परत देणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

२) ग्राहकाच्या मागणीनुसार वसूल केलेली पीसीसी पोलची किंमत रु. १०००/- ग्राहकास परत देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

## कारणमिमांसा

ग्राहकाने त्यांच्या नवीन विद्युत कनेक्शनसाठी तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, आष्टा कार्यालयाकडे रु. ३२५०/- दि. ३१.०१.२००५ रोजी भरले होते. त्यामध्ये मीटर कॉस्ट म्हणून रु. १०००/- भरुन घेण्यात आले. सदरील रक्कम नवीन विद्युत कनेक्शनसाठी घेतलेली असून ती म.रा.वि. मंडळ / महावितरण यांच्या परिपत्रक क्र. ६४६ दि. १७.०६.२०००, क्र. ६६८ दि. ३०.०७.२००२ व क्र. ४ दि. ०७.०७.२००५ नुसार योग्य आहे असे मंचाचे मत झाले आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. ०८.०९.२००६ नंतर ग्राहकाकडून मीटर शुल्क भरुन घेऊ नये व तसेच ज्यांच्याकडून नंतर मीटर शुल्क भरुन घेतली असेल त्यांची रक्कम परत करण्याचे आदेश दिले. त्यामुळे सदर ग्राहक हा मीटर शुल्क परत करणेसाठी पात्र नाही असे मंचाचे स्पष्ट मत झाले आहे **म्हणून प्रश्न क्र. १चे उत्तर ' नकारार्थी '** देण्यात आले.

तक्रारदारास आष्टा कार्यालयाकडून दि. ०९.०४.२००५ रोजी कनेक्शन देण्यात आले. कनिष्ठ अभियंता, आष्टा यांनी मंचास सादर केलेल्या दि. ०८.०८.२०१४ च्या स्थळ पहाणी अहवाल नुसार ग्राहकास कनेक्शन देतेवेळी नवीन पोल उभा केला असल्याचे स्पष्ट होत नाही.

सुनावणी दरम्यान मंचाने पोल फॅक्टरीमध्ये पोल तयार करतेवेळी नोंदविण्यात आलेल्या दिनांक व वर्षाचा क्रमांक तपासून तो कळवावा असे सांगण्यात आले होते. परंतु या बाबत कोणतेही उत्तर आजतागायत मंचास प्राप्त झाले नाही.

ग्राहक हे जेष्ठ नागरिक असून ते सध्या कल्याण येथे रहात आहेत. त्यांच्यावर झालेल्या अन्यायापोटी त्यांनी माहितीच्या अधिकारामध्ये माहिती मागवून अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १८.०७.२०१४ रोजी तक्रार दाखल केली होती. सांगली कक्षाने कोणतीही उपाय योजना न केल्यामुळे मंचाकडे दि. २८.१०.२०१४ रोजी अपील दाखल केले. वरील बाबींची विशेष दखल मंचाने घेतली आहे.

उप कार्यकारी अभियंता, आष्टा यांनी दिलेले लेखी निवेदन व सुनावणी दरम्यान केलेले अभिकथन लक्षात घेता, तक्रारदाराच्या नवीन कनेक्शनसाठी कोणताही पोल उभा केल्याचे स्पष्ट होत नाही. परंतु त्यांच्याकडून चलन भरुन घेतेवेळी पीसीसी पोलच्या किंमतीपोटी रु.१०००/- भरुन घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदर रक्कम तक्रारदारास परत करणे योग्य होईल असे मंचाचे मत झाले आहे.**म्हणून प्रश्न क्र. २ चे उत्तर ' होकारार्थी '** देण्यात आले आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) ग्राहकाची तक्रार अंशतः मंजूर करणेत येत आहे.

२) मीटर कॉस्टपोटी वसूल केलेली रक्कम परत करणेबाबतची ग्राहकाची मागणी फेटाळण्यात येत आहे.

३) पीसीसी पोलच्या किंमतीपोटी वसूल केलेली रक्कम रु. १०००/- परत करणेत यावी. सदर रक्कम ग्राहकाच्या पुढील विद्युत देयकात समायोजित करणेत यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : (जी. बी. पानकर)

सदस्य सचिव

बी.जी. पवार, अध्यक्ष .. सही/-

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.